# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.),
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, ता. जि. ठाणे - ४०११०१.

मुख्य कार्यालय भाईंदर.

जा. क्र. मि.भा./मनपा/नर/--३९३-----/-२०१६-१७

दिनांक २७।८।२०१६

प्रति,
अधिकार पत्रधारक - मे. जांगीड प्रॉपर्टीज प्रायव्हेट लिमिटेड
द्वारा - वास्तुविशारद - मे. नकाशा आर्किटेक्ट

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे - नवघर सर्वे क्र./ हिस्सा क्र. नविन ६३/४, ६१, ६०/२,४ जुना २११/४, २१२, २१३/२,४ या जागेत नियोजित बांधकामास बांधकाम प्रारंभपत्र मिळणेबाबत.

संदर्भ :-१) आपला दि.२७/०१/२०१६ व दि.०४/०३/२०१६ रोजीचा अर्ज.
२) मे. सक्षम प्राधिकारी नागरी संकुलन ठाणे यांचेकडील आदेश क्र. यु.एल.सी./टी.ए/एटीपी/डब्ल्यु.एस.एच.एस.-२०/एस.आर-१४७१ दि.१३/०८/२०१० व यु.एल.सी./टिए/एटीपी/कलम-२०/टिडीआर/एसआर-१८७० दि.१३/०८/२०१० व युएलसी/टिए/नवघर/एसआर-२७ दि.३१/१२/१९९९ व युएलसी/टिए/टे-६/नवघर/एसआर-१५०८ दि.२३/१०/२००७ अन्वये कलम ८(४) चे आदेश
३) मा. जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडील अकृषिक परवानगी आदेश क्र. महसूल/क-१/टे-१/एनएपी/एसआर-४४/२००३ दि.१५/०६/२००५
४) अग्निशमन विभागाकडील पत्र क्र. मनपा/अग्नि/२४/२०१०-११, दि.१६/०६/२०१० अन्वये तात्पूरता नाहरकत दाखला.
५) या कार्यालयाचे पत्र क्र. मिभा/मनपा/नर/२३१८/२०१०-११, दि.१७/०९/२०१० अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी.
६) पर्यावरण विभागाकडील पत्र क्र.२१-६०/२००७-IA. III दि.०७/०८/२००७ अन्वयेचा नाहरकत दाखला.

## -: सुधारीत बांधकाम प्रारंभपत्र :-
### (विकास हक्क प्रमाणपत्राच्या वापारसह) (इमारत क्र. सी-३ व सी च्या मर्यादित)

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ४४, ४५ अन्वये व मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३ ते २६९ विकास कार्य करण्यासाठी / बांधकाम प्रारंभपत्र मिळण्यासाठी आपण विनंती केले नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे – नवघर सि.स.नं./सर्वे क्र./हिस्सा क्र. नवीन ६३/४, ६१, ६०/२,४ जुना २११/४, २१२, २१३/२,४ या जागेतील रेखांकन, इमारतीचे बांधकाम नकाशांस खालील अटी व शर्तीचे अनुपालन आपणाकडून होण्याच्या अधीन राहून ही मंजूरी देण्यात येत आहे.

१) सदर भुखंडाचा वापर फक्त बांधकाम नकाशात दर्शविलेल्या रहिवास + वाणिज्य वापरासाठीच करण्याचा आहे.

२) सदरच्या बांधकाम परवानगीने आपणास आपल्या हक्कात नसलेल्या जागेवर कोणतेही बांधकाम करता येणार नाही.

